# Maharashtra Board Class 10 Sanskrit Amod Notes Chapter 14 प्रतिपदं संस्कृतम्

## प्रतिपदं संस्कृतम् Summary in Marathi

प्रस्तावना :

जगातील सर्वात प्राचीन असलेली आपली संस्कृतभाषा देववाणी, ज्ञानभाषा अशा शब्दांत गौरविली जाते. परंतु ही प्राचीन भाषा 21व्या शतकात कशी उपयोगी पडेल? त्याच्या अध्ययनाने काय फायदा होईल? त्यातून उपजीविका प्राप्त करता येईल का? अनेक प्रश्न आपल्या मनात असतात.

आपल्या पाठ्यपुस्तकाच्या मुखपृष्ठावर तसेच मलपृष्ठावर संस्कृतभाषेचा प्रवास, त्यातील साहित्याचा इतिहास आणि आजच्या युगात संस्कृतभाषा कशी उपयुक्त ठरते हे अत्यंत उत्तमरीत्या चित्रित केले आहे. विविध शास्त्रांवर आधारीत प्राचीन ग्रंथसंपदा काळ आणि स्थळाच्या पलीकडे उपयुक्त ठरते.

'प्रतिपदं संस्कृतम्' हा सार्वजनिक ठिकाणी घडलेला एक संवाद असून संस्कृतभाषा ही केवळ घोकंपट्टी करून केवळ परीक्षेत जास्त गुण मिळवण्याचे साधन नसून यशस्वी आयुष्यासाठी पदोपदी आपल्याला सहकार्य व मार्गदर्शन करते.

परिच्छेदः 1

संवादस्थलम् .................. संस्कृतपुस्तकं दर्शयति।

अनुवादः

(संभाषणाचे ठिकाण – विमानतळावरील प्रतीक्षालय.) काही प्रवासी प्रवास सुरू होण्याची वाट पाहत आहेत.

काही सुखाने (आरामात) झोपले आहेत.
काहीजण कॉफीचा आस्वाद घेत आहेत.
एक महिला तेथे पोहोचते.
ती बसून कोणतेतरी पुस्तक वाचू लागते. पुस्तकाच्या मुखपृष्ठावर 'संस्कृत-सूक्ति-सङ्ग्रह' असे नाव आहे. ते पाहून जवळच असलेले एक सद्गृहस्थ तिच्यासोबत संभाषण सुरू करतात.
गृहस्थ : आपण संस्कृत शिकवता का?
महिला : (हसून) नाही हो.
गृहस्थ : आपल्याजवळ हा सुभाषितसंग्रह पाहून मला तसे वाटले.
महिला : जरी मी संस्कृत शिकवत नसले, तरी या पुस्तकाचा माझ्या कार्यक्षेत्राशी संबंध आहे.
गृहस्थ : असे होय? कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहात आपण?
महिला : मी व्यवस्थापन प्रशिक्षिका म्हणून कार्यरत आहे. मला माहीत आहे की, रामायण, महाभारत, किरातार्जुनीय, रघुवंश इ. ग्रंथांमध्ये अनेक श्लोक आहेत ज्यामध्ये व्यवस्थापनाचे मूलमंत्र सोदाहरण सांगितले आहेत. काव्याच्या माध्यमातून विषय समजण्यास सोपा होतो.
मी या पद्धतीचा स्वीकार केला आणि सर्वांना ते आवडले म्हणूनच मी संस्कृतभाषा व संस्कृत साहित्याचा पुनः

अभ्यास सुरू केला.
गृहस्थ : आश्चर्य आहे! माझा संस्कृतचा अभ्यास शाळेनंतर थांबला होता. हल्लीच तो (अभ्यास) परत सुरू केला आहे.
महिला : कसे काय?
गृहस्थ : खरेतर मी वाणिज्य शाखेचा पदवीधर आहे. विधिशाखेची पदवीसुद्धा मी प्राप्त केली आहे. सध्या बहुराष्ट्रीय संस्थेत विधिविषयक सल्लागार म्हणून मी कार्यरत आहे. माझ्या गुरुंनी सांगितले आहे की, कौटिलीय अर्थशास्त्र, याज्ञवल्क्यस्मृति इ. ग्रंथांचे अध्ययन त्यासाठी उपयुक्त ठरेल, म्हणूनच शास्त्रीय संस्कृत ग्रंथांचा अभ्यास करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.
(पिशवीतील कोणतेतरी संस्कृत पुस्तक दाखवतात.)

परिच्छेदः 2

तयोः पृष्ठतः ................ अधुना अवगच्छामि।

अनुवादः

(त्यांच्या जवळच काही तरुण मुले गप्पांत रमली होती. प्रसाद, समीर, लीना व तनुजा एकमेकांचे मित्र आहेत. त्यापैकी एकजण ते पुस्तक पाहून महोदयांजवळ येऊन म्हणतो)
समीर : महोदय, आपल्या संभाषणात मी संस्कृतचा संदर्भ ऐकला आपणसुद्धा जागतिक संस्कृत परिषदेसाठी परदेशी निघाला आहात का?
गृहस्थ : नाही खरं तर. परंतु ही कसली जागतिक संस्कृत परिषद? तुम्ही संस्कृतचे विद्यार्थी आहात का?
समीर : होय. मी आय.आय.टी. म्हणजेच भारतीय प्रौद्योगिकी संस्थेमध्ये संगणक अभियांत्रिकीचा विद्यार्थी आहे. तिथे विद्यार्थी संस्कृतसुद्धा शिकू शकतात.
तिथे मानव्यविद्या विभागात व्याकरणशास्त्रावर आधारित अष्टाध्यायी हा ग्रंथ शिकवला जातो. मी संस्कृत व्याकरण व संगणकशास्त्र या विषयांना अनुसरून संशोधन करीत आहे. त्यासंबंधीचा शोधनिबंध सादर करण्यासाठी मला परिषदेत निमंत्रित करण्यात आले आहे.
महिला : काय आश्चर्य आहे.
तंत्रज्ञान संस्थेमध्ये?
संस्कृतचा अभ्यास?
गृहस्थ : केवळ कलाशाखेचे विद्यार्थी महाविद्यालयात संस्कृत शिकतात असे मी समजत होतो.
समीर : थांबा जरा.
तर मग नक्कीच माझ्या मित्रांशी भेट घडवतो.
हे सगळे सुद्धा परिषदेत सहभाग घेणार आहेत.
प्रसाद : (पुढे येऊन) नमस्कार.
मी रसायनशास्त्राचा विद्यार्थी आहे.
'प्राचीन भारतीय रसायनशास्त्र' हा माझ्या संशोधनाचा विषय आहे. त्याविषयीचे ग्रंथ संस्कृतभाषेत लिहिलेले आहेत. शाळेत जो संस्कृतचा अभ्यास केला, त्याचे महत्त्व मला आता समजले.

परिच्छेदः 3

अहमपि ................ विशेषार्हता भवति।

अनुवादः

https://www.evidyarthi.in/

लीना : मीसुद्धा भाषाशास्त्राचा अभ्यास करुन बंगळुरु येथे सॉफ्टवेअर क्षेत्रात भारतीय भाषा विश्लेषिका म्हणून कार्यरत आहे. माझा अनुभव आहे की, संस्कृतचे ज्ञान आधुनिक भारतीय भाषांचे विश्लेषण करताना अत्यंत उपयोगी पडते.
तनुजा : माझे निवेदनाचे काम आहे. संस्कृत श्लोकांच्या पठनामुळे शब्दोच्चारणाचा उत्तम सराव होतो. त्यामुळे अभिनय व निवेदनातील प्रभाव वाढतो. सध्या कलाक्षेत्रात कार्यरत असणारे आमच्यापैकी काहीजण भरतमुनींच्या नाट्यशास्त्राचा अभ्यास करत आहोत.
समीर : अहो, परदेशीसुद्धा अनेक लोक भारतीय तत्त्वज्ञान, योगशास्त्र, इतिहास, स्थापत्यशास्त्र इ. भारतीयशास्त्रांचा अभ्यास करण्यास उत्सुक आहेत, त्यासाठी अनेक दूरचित्रवाहिन्यासुद्धा आहेत. तिथे संस्कृत तज्ज्ञांची आवश्यकता असते. माझा मित्र आशय संपादक म्हणून तिथे काम करतो.
महिला : आम्ही शाळेत संस्कृत शिकलो. परंतु त्याचा अशाप्रकारे उपयोग होईल असा कधी विचारच केला नाही.
गृहस्थ : खरे आहे. लीना : ज्या कोणत्या क्षेत्रात आपण उपजीविकेसाठी कार्यरत आहोत, तिथे संस्कृतचे ज्ञान आपल्यासाठी विशेष पात्रता ठरते.

शब्दार्थाः

1. स्नातक: – graduate – पदवीधर
2. मूलतत्त्वानि – basic principles – मूळ तत्त्व
3. दृष्टान्तसहितानि – along with examples – सोदाहरण
4. विधिविमर्शक- रूपेण – as a legal advisor – विधिविषयक सल्लागार म्हणून
5. व्यवस्थापन – as a management – व्यवस्थापन प्रशिक्षिका
6. प्रशिक्षिकारूपेण – trainer – रुपाने
7. वाणिज्य शाखाया: – of commerce stream – वाणिज्य शाखेचे
8. विधिशाखायाः – of law stream – विधिविषयक
9. बहुराष्ट्रीय – in a multinational – बहुराष्ट्रीय संस्थेमध्ये
10. संस्थायाम् – company
11. विश्वसंस्कृत – World Sanskrit – जागतिक संस्कृत
12. परिषद् – Conference – परिषद
13. अभियान्त्रिकी – engineering – अभियांत्रिकी
14. रसायनशास्वस्य – of chemistry – रसायनशास्त्राचा
15. मानव्यविद्या – in the department – मानव्यविद्या
16. विभागे – of humanities – विभागामध्ये
17. प्रस्तोतुम् – to present – प्रस्तुत करण्यासाठी
18. गोष्ठिषु रताः – engrossed in chatting – गप्पांत रमलेले
19. आशयसम्पादकः – content editor – आशय संपादक
20. भारतीयभाषा – Indian language – भारतीयभाषा विश्लेषिका
21. विश्लेषिका – analyst
22. विशेषार्हता – special qualification – विशेष पात्रता
23. भाषाशास्त्रम् – linguistics – भाषाशास्त्र
24. पार्शनिवेदनम् – anchoring – निवेदन
25. उपयोजनम् – utilisation – उपयोग
26. अधीत्य – having studied – शिकून
27. वृत्त्यर्थम् – for livelihood – उपजीविकेसाठी